प्रेसनोट

दिनांक –०९/०३/२०२१

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा आंबेसरी, ता.डहाणू जि.पालघर येथील मुख्याध्यापक यांस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे (कॅम्प पालघर) यांना लाच घेताना रंगेहाथ पकडले.

१	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक	पालघर कॅम्प ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे अंतर्गत...
२	गुन्हा नोंद क्रमांक	डहाणू पोलीस ठाणे
३	कलम	भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे
४	लोकसेवकाचे नाव व कार्यालय	आरोपी उत्तम हिंदूराव भोसले वय ५३ वर्षे, मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, आंबेसरी, ता.डहाणू, जि.पालघर वर्ग – २ रा. ए/१०१, साईसंस्था हिल क्रेस्ट, टेंबीपाडा रोड, भांडुप प. मुंबई
५	मागितलेल्या लाचेची रक्कम	२,०००/–रूपये.
६	स्विकारलेली लाचेची रक्कम	२,०००/– रुपये
७	थोडक्यात हकिगत	यातील तक्रारदार हे शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, आंबेसरी, ता. डहाणू, जि.पालघर येथे क्रिडा शिक्षक असून आलोसे हे सदर आश्रम शाळेचे मुख्याध्यापक आहेत. तक्रारदार यांचे पगारबिल मंजूर करण्यासाठी आलोसे यांनी ३,०००/ रूपये लाचेची मागणी केली म्हणून तक्रारदार यांनी दिनांक ०९/०३/२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो ठाणे (कॅम्प पालघर) कार्यालयात तक्रार दिली आहे. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०९/०३/२०२१ रोजी तक्रारदार यांना आरोपी लोकसेवक यांचे कार्यालयात पंचासह पाठवून पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाचे अनुषंगाने तडजोडीअंती २,०००/– रूपये लाचेची मागणी केली. सदर लाचेची रक्कम लागलीच दि.०९/०३/२०२१ रोजी १९:३० वा. च्या सुमारास शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, आंबेसरी, ता.डहाणू, जि.पालघर येथे आलोसे यांच्या रूममध्ये स्विकारली असता नमूद आलोसे यांना ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, (कॅम्प पालघर) कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

पालघर जिल्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
मोबाईल क्र. :–9850158810 / 9923699430

(भारत साळुंखे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे (कॅम्प पालघर)